# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

**जा.क्र.मनपा/पा.पु.व मलनि/जन/प्र.लि.१४/क.अ.६/ २००५ /२०२५-२६** **दि. १४/१०/२०२५**

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :-** वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीबाबत ..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये दै. लोकसत्ता या वृत्तपत्रात दि.08/10/2025 रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीचा खुलासा सोबत जोडून देत आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग

## // खुलासा //

"पाणी टँकरमुळे रस्ते निसरडे" या मथळयाखाली लोकसत्ता या वृतपत्रामध्ये दि.08/10/2025 रोजी बातमी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने खुलासा सादर करण्यात येतो की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन अ‍ॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. यांच्याकडून 86 द.ल.लि. व महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडाळ यांच्याकडून 125 द.ल.लि. असा एकूण 211 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. परंतु मिरा-भाईंदर शहरास प्रत्यक्षात सरासरी 190 ते 196 द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. सध्याच्या लोकसंख्खेनुसार सरासरी 215 द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धार्मिक स्थळे, आदिवासी पाडे, झोपडपट्टी परिसर व शासकिय आस्थापना तसेच ज्या इमारतींना कमी पाणी पुरवठा होत आहे अशा इमारती यांना टँकव्दारे पाणी पुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे धोरण आहे. त्यानुसार टँकरव्दारे शहरात शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येतो.

तथापि मिरा-भाईंदर क्षेत्रामध्ये असलेल्या खाजगी जलस्त्रोतांव्दारे (विहिरी, बोअरवेल, तलाव इ.) व्दारे भुजलाचा उपसा करुन त्याचा व्यवसाय करणारे व्यावसायिक यांच्यावर तसेच खाजगी स्त्रोतांचे व त्याव्दारे भुजलाचा बेकायदेशिर उपसा नियंत्रित करणे व त्यांचे विनियमन करणेचे अधिकार "उप-विभागीय अधिकारी, ठाणे विभाग" यांना असुन सदर जिल्हा प्राधिकरणास असलेले अधिकार मिरा-भाईंदर शहराकरीता "अप्पर तहसिलदार,मिरा-भाईंदर" यांना प्रदान केलेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग यांनी त्यांचे कडील क्र.टीडी/प्रशासन/टे-4/विंधन विहिर/कवी-1161/2025/971 दि.21/04/2025 रोजीच्या पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कळविले आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे टँकर बाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवर मा. अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांचे मार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे.

तसेच महानगरपालिकेने खाजगी टँकर व इतर वाहनांव्दारे अनधिकृतरित्या पाणी उपसा करुन जलस्त्रोतांना व नागरीकांना धोका पोचविणाऱ्या टँकर, टँकर मधुन वाहत असलेल्या पाणी टँकरमुळे रस्ते निसरडे व इतर धारकांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत सहा. पोलीस निरिक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, भाईंदर (प.) यांना कळविण्यात आलेले आहे.

त्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होत आहे अशी बाब नाही.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

५



8/10/25 लोकसत्ता

# पाणी टँकरमुळे रस्ते निसरडे

## पालिकेच्या मागणीकडे पोलीस दुर्लक्ष करत असल्याचा आरोप

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मिरा, भाईंदर शहरात रस्त्यावर पाणी सांडून रस्ते निसरडे करणाऱ्या टँकरची समस्या अद्याप कायम आहे. यामुळे अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दरम्यान अशा टँकर चालकांविरोधात कारवाई करण्याची मागणी महापालिकेने वाहतूक पोलिसांकडे केली असतानाही, याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.




शहरात पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. त्यामुळे दाट लोकवस्ती आणि उचभ्रू इमारती असलेल्या भागांमध्ये नागरिक मोठ्या प्रमाणात टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत. परिणामी शहरात पाण्याच्या टँकरची रहदारी वाढली आहे. मात्र हे टँकर पाणी वाहतूक करताना सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या नियमांकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे टँकरमधील पाणी रस्त्यावर सांडत असून, रस्ते निसरडे होत आहेत. अनेकदा रस्त्यावर सांडणाऱ्या पाण्यामुळे मातीचा घट्ट थर साचत आहे. त्यामुळे वाहनचालक त्रस्त आहेत. यापूर्वी अशाच निसरड्या रस्त्यांमुळे दुचाकीस्वारांचे अपघात होऊन जीवितहानीही झाली होती. म्हणून टँकरमधून होणाऱ्या पाणी गळतीबाबत उपाययोजना आखण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने महापालिकेकडे करण्यात आली. मात्र पालिका प्रशासनाला कारवाईचे अधिकार मर्यादित असल्याने, या संदर्भात वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी पालिकेकडून करण्यात आली होती. मात्र वाहतूक पोलिसांकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने शहरातील टँकर पाणी गळतीची समस्या कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत पोलीस प्रशासनाशी संपर्क केला असता त्यांनी अशा वाहनांवर कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले.

### वाहनचालक त्रस्त

शहरात सध्या पाण्याची वाहतूक करणाऱ्या टँकरचे प्रमाण वाढले आहे. यातील बहुसंख्य टँकर हे नियमांचे पालन करत नसल्याचे दिसून येत आहे. अनेकदा या टँकरमधून पाण्याची गळती होत असल्याने रस्त्यांवर पाणी सांडून ते निसरडे होतात. काहीवेळी चिखल पसरतो. अशावेळी इतर वाहनचालकांना विशेष करून दुचाकीस्वारांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागतो. प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.